# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

**(Formerly Pune University)**

**Ganeshkhind, Pune – 411007**

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone : 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट / Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/1426 दिनांक : 10/08/2024

**प्रति,**
मा. अध्यक्ष/सचिव,
द.पी.जी.के. मंडल,
श्री. गुजराती केलवणी मंडल, प्रोफ.जे.पी.त्रिवेदी विद्याभवन,
१४३३, कसबा पेठ, पुणे

**विषय: 'स्वायत्त दर्जा' प्रदान करण्याबाबत......**

**संदर्भ: विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.2-10/2023 (AC- Policy), दिनांक १० जुलै, २०२४**

महोदय,

उपरोक्त विषयास आणि संदर्भीय पत्रांस अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या **एच.व्ही.देसाई सिनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, बुधवार पेठ, पुणे** या संलग्न महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (द) आणि कलम १२२ (१) व महाराष्ट्र शासन राजपत्र/अधिसूचना, दिनांक २२ मे, २०२३ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि संचलित किंवा घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याबाबतची मानके) २०२३ चा एकरूप परिनियम क्र. ३ मधील तरतूदींच्या, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिसंस्था/नियामक मंडळ आणि भारत सरकार, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, परिनियम, आदेश, मार्गदर्शक तत्वे इ. च्या अधीन राहून, शैक्षणिक वर्ष **२०२४—२०२५ ते २०२८—२०२९** या पाच वर्षे कालावधीसाठी 'स्वायत्त दर्जा' प्रदान करण्यात येत आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम तसेच या विभागातील परिपत्रकांमधील मार्गदर्शक तत्वे आपणावर बंधनकारक असतील.

पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २ (६१) अनुसार स्वायत्त महाविद्यालयातील अध्यापकांच्या नेमणुकीस विद्यापीठाची अध्यापक/शिक्षक मान्यता घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त महाविद्यालयाच्या स्वायत्त दर्जाची मुदत संपुष्टात येण्याच्या अगोदरच्या वर्षीच्या ३० सप्टेंबर पूर्वी आवश्यकतेनुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरणासंदर्भातील संलग्नताविषयक प्रस्ताव विद्यापीठास विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपला,

**(प्रो.(डॉ.) विजय खरे)**
**प्रभारी—कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२
२. मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२
३. मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२
४. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे – ४११ ००१
५. मा. सह संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे – ४११ ००१
६. मा. प्राचार्य, एच.व्ही.देसाई सिनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, बुधवार पेठ, पुणे .
७. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
९. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०. उपकुलसचिव, छाननी व तालनीकरण कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
११. सहा.कुलसचिव, प्रमाणपत्र कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१२. सहा.कुलसचिव, समन्वय कक्ष परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१३. उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१४. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१५. सहा.कुलसचिव, अंतर्गत गुणवत्ता व सिद्धता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
१६. उपकुलसचिव,, आरक्षण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१७. सहायक कुलसचिव, मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
१८. सहायक कुलसचिव, मा. प्र–कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
१९. सहायक कुलसचिव, माहिती व व्यवस्थापन कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ